**ठळक बातम्या**

- राज्यातल्या लोकसभा निवडणुकीसाठीचं मतदान पूर्ण, प्राथमिक आकडेवारीनुसार ५ वाजेपर्यंत ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदानाची नोंद

- देशातलं सर्वात मोठं मतदान केंद्र धारावीत, एकाच संकुलातल्या ३४ मतदान केंद्रावर सुमारे ३० हजार मतदारांसाठी नियोजन

- राज्य शिक्षण मंडळाच्या १२ वीच्या परीक्षेचा निकाल उद्या जाहीर होणार

**आणि**

- इराणचे अध्यक्ष एब्राहिम रईसी यांच्या निधनामुळं देशात उद्या एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

**<><><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातल्या १३ मतदारसंघांसह संपूर्ण राज्यात लोकसभा निवडणुकीचं मतदान आज पूर्ण झालं. प्राथमिक आकडेवारी नुसार आज संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ४८ पूर्णांक ६६ टक्के मतदानाची नोंद झाली आहे. यंदा दिंडोरीत सर्वाधिक ५७ टक्क्यांहून अधिक आणि पालघर ५४ टक्क्यांहून अधिक मतदानाची नोंद झाली. सर्वात कमी, म्हणजे ४१ पूर्णांक ७० शतांश टक्के मतदान कल्याणमध्ये झालं आहे. आज मतदान झालेल्या १३ पैकी १० मतदारसंघांमधलं मतदान प्राथमिक आकडेवारीनुसार ५० टक्क्यांपेक्षाही कमी आहे.

भिवंडीत ४८ पूर्णांक ८९ शतांश टक्के,
धुळ्यात ४८ पूर्णांक ८१ शतांश टक्के,
नाशिक ५१ पूर्णांक १६ शतांश टक्के,
उत्तर मध्य मुंबई मतदारसंघात ४७ पूर्णांक ३२ शतांश टक्के,
उत्तर पूर्व मुंबई इथं ४८ पूर्णांक ६७ शतांश टक्के
उत्तर पश्चिम मुंबई ४९ पूर्णांक ७९ शतांश टक्के,
दक्षिण मुंबई ४४ पूर्णांक २२ शतांश टक्के
आणि
दक्षिण मध्य मुंबई ४८ पूर्णांक २६ शतांश टक्के,
तर ठाण्यात ४५ पूर्णांक ३८ शतांश टक्के मतदान झाल्याची नोंद आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत हे मतदान कमी आहे. २०१९ च्या निवडणुकीत राज्यातल्या मतदानाची अंतिम टक्केवारी ६० पूर्णांक ७९ शतांश टक्के, तर २०१४ च्या निवडणुकीत ६० पूर्णांक ३२ शतांश टक्के इतकी होती.

राज्यातल्या १३ मतदारसंघांमधे मिळून २६४ उमेदवार या टप्प्यात नशीब आजमावत आहेत. केंद्रीय मंत्री पीयुष गोयल, श्रीकांत शिंदे, राजन विचारे, कपिल पाटील, हेमंत गोडसे, राहुल शेवाळे, अरविंद सावंत हे विद्यमान खासदार तसंच वर्षा गायकवाड, उज्ज्वल निकम, अनिल देसाई या महत्त्वाच्या उमेदवारांच्या लढती या टप्प्यात होत आहेत.

**<><><><><>**

एका मतदाराच्या नावे जर दुसऱ्या व्यक्तीनं मतदान केलं असेल तर मूळ मतदाराच्या ओळखीची खात्री पटवून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या

निर्देशानुसार या मतदाराला Tender Ballot Paper अर्थात, प्रदत्त मतपत्रिका देऊन त्या व्यक्तीला मतदान करू द्यायची तरतूद आहे. त्यानुसार ठाणे लोकसभा मतदारसंघातंर्गत १४८ क्रमांकाच्या विधानसभा मतदारसंघात असलेल्या केंद्र क्रमांक २७३ वर झालेल्या अशाच एका प्रकारानंतर ओळखीची खात्री पटल्यानंतर मूळ मतदाराला प्रदत्त मतपत्रिका भरुन मतदानाचा अधिकार बजावू दिला, अशी माहिती ठाणे मतदार संघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील यांनी दिली आहे.

**<><><><><>**

देशातल सर्वात मोठं मतदान संकुल मुंबईत धारावीतल्या ट्रान्झिट कॅम्प शाळा संकुलात असून तिथे एकूण ३४ मतदान केंद्रं उभारली होती. मतदारांच्या सोयीसाठी या केंद्रांना वेगवेगळे रंग दिले होते आणि त्याच रंगाच्या मतदान चिठ्ठ्या मतदारांना दिल्या होत्या. याशिवाय प्रवेशद्वाराजवळ त्या त्या रंगांचे दिशादर्शक फलकही लावण्यात आले आहेत. रंगाच्या मदतीनं मतदार आपलं मतदान केंद्र सहजपणे शोधून मतदान करत होते. इथल्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अश्विनी सुर्वे यांनी आकाशवाणीला सांगितलं....

**होल्ड- बाईट- अश्विनी सुर्वे (२५ सेकंद)**

पालघर जिल्ह्यातल्या डहाणू विधानसभा मतदारसंघात चिखले गावात जिल्हा परिषद शाळेत उभारण्यात आलेलं कोळी मतदान केंद्र हे विशेष आकर्षण ठरलं आहे. या मतदान केंद्रात काम करत असलेले सर्व कर्मचारी हे कोळी समाजाच्या पारंपरिक वेशभूषेत आपलं कर्तव्य बजावताना दिसून येत आहेत.

धुळे शहरातलं मतदान केंद्र क्रमांक १२१ हे गरुड प्राथमिक शाळा या ब्रिटीश कालीन दगडी वारसा वास्तूमध्ये तयार केलं होतं. मतदारांसाठी गालीचा अंथरुन आणि सजावट केलेल्या दालनामध्ये मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती.

कल्याण (पूर्व) विधानसभा मतदार संघात जाईबाई शाळा आणि खडेगोळवली इथल्या राजीव गांधी विद्यालय या दोन शाळांमध्ये सुमारे दीडशे ते दोनशे तृतीयपंथी मतदारांनी मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला.

नाशिक लोकसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार शांतिगिरी महाराज यांनी मतदान केंद्रामध्ये ईव्हीएम यंत्राला हार घातल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

काही ठिकाणी मतदानयंत्रं काम करीत नसल्याच्या तक्रारी होत्या. कल्याण लोकसभा मतदार संघाअंतर्गत मुंब्रा – कळवा विधानसभा मतदार संघात मतदान केंद्र क्रमांक २४३ या मतदान केंद्रावर व्हीव्हीपॅट (VVPAT) मशीन बंद पडल्याची कोणतीही घटना घडलेली नव्हती, असं निवडणूक आयोगातर्फे स्पष्ट करण्यात आलं आहे. व्हीव्हीपॅट मशीन बंद पडल्याबाबतच्या बातम्या सकाळी प्रसारित झाल्या होत्या. या बाबींची दखल घेऊन अतिरिक्त सहायक निवडणूक अधिकारी संदीप थोरात यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जावून खातरजमा केली. त्यानंतर ही माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या हाताळणीत निवडणूक आयोग पक्षपात करत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे

अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषदेत केला. मतदार उत्साहाने मतदानासाठी येत आहेत, मात्र मतदान केंद्रातले अधिकारी दिरंगाई करत आहेत. मुंबईत अनेक ठिकाणी पिण्याचं पाणी, सावलीची सोय केलेली नाही. यामुळे ज्येष्ठ मतदार, महिलांची मोठी गैरसोय होत आहे, असा आरोप त्यांनी केला.

आमच्या पक्षाला मतं मिळण्याची शक्यता असलेल्या मतदारसंघांमध्ये मुद्दाम दिरंगाई होत आहे, मतदारांना पुनःपुन्हा ओळखपत्रं विचारली जात आहेत, असंही ठाकरे यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा प्रधानमंत्री बनवण्याचं, विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी अविश्रांत मेहनत घेणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्यांसमोर आपण नतमस्तक असल्याचं भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं आहे. कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात त्यांनी या भावना व्यक्त केल्या आहेत. निवडणुकीत मोठ्या यशाला गवसणी घालत ४ जूनला सर्वजण मिळून जल्लोष करू आणि महायुतीचा झेंडा अभिमानानं फडकवू असं बावनकुळे म्हणाले.

घरदार विसरून, अथक परिश्रम करून कोट्यवधी मतदारांपर्यंत पोहोचणाऱ्या भाजपा कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

श्रोते हो, राज्यात आज झालेल्या मतदानाचा आढावा घेणारा 'मतदानाचा मागोवा' हा चर्चात्मक कार्यक्रम अस्मिता वाहिनीवर सादर होणार आहे. रात्री सव्वा आठ ते पावणे नऊ या वेळेत हा कार्यक्रम सादर होईल.

**<><><><><>**

राज्य शिक्षण मंडळाने मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षांचे निकाल उद्या म्हणजे मंगळवार दिनांक २१ मे रोजी राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या संकेतस्थळावर दुपारी एक वाजता जाहीर केले जाणार आहेत. मंडळाच्या https://mahahsscboard.in/ या संकेतस्थळावर हे निकाल विद्यार्थ्यांना पाहता येतील.

**<><><><><>**

राज्यातल्या १ लाख ३१ हजार अंगणवाड्यांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी केली जाणार आहे. उच्च शिक्षणात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली असताना आता येत्या शैक्षणिक वर्षात पूर्वप्राथमिक स्तरावरही धोरणाची अंमलबजावणी सुरू केली जाणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तकं राज्यातल्या १ लाख ३१ हजार अंगणवाड्यांना पुरवली जाणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शैक्षणिक चौकट बदलण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाचा औपचारिक शिक्षणात समावेश झाला आहे. या अनुषंगाने धोरणात प्रस्तावित केल्यानुसार एनसीईआरटी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने पूर्वप्राथमिक किंवा पायाभूत स्तरासाठीचा अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे.

<><><><><>

इराणचे अध्यक्ष इब्राहिम रईसी यांच्या अपघाती निधनानंतर इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनेई यांनी उपराष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोखबेर यांची काळजीवाहू अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. खामेनेई यांनी पाच दिवसांचा राष्ट्रीय दुखवटाही घोषित केला आहे. मोखबेर यांच्या नियुक्तीनंतर ५० दिवसांत नव्याने निवडणुका घेणं अनिवार्य आहे. इब्राहिम रईसी यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना घेऊन जाणारं हेलिकॉप्टर काल दुपारी अपघातग्रस्त झालं होतं. अध्यक्ष रईसी आणि परराष्ट्र मंत्री होसैन अमीर-अब्दोल्लाहियान यांच्या अपघाती निधनामुळे उद्या एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा भारतानं जाहीर केला आहे.

<><><><><>

नुकत्याच मंजूर  झालेल्या भारतीय दंड संहिता, गुन्हेगारी दंड प्रक्रिया आणि भारतीय साक्षीपुरावा कायद्यांना आव्हान देणाऱ्या तीन जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळल्या. यावर याचिकाकर्त्यानं आपण दाखल करत असलेली जनहित याचिका काढून घेण्याची परवानगी मिळावी अशी विनंती न्यायालयाकडे केली आहे.

<><><><><>

पुण्यात वाघोली इथं दगडखाण कामगार वस्तीजवळ बेकायदा कचरा डेपो उभारल्याप्रकरणी पुणे महानगरपालिकेला ‘एनजीटी’ अर्थात, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने पर्यावरणाची हानी केल्याबद्दल एक कोटी ७९ लाख १० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम दोन महिन्यांमध्ये

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करावी आणि पुन्हा वस्तीजवळ कचरा टाकू नये, असंही आदेशात नमूद केलं आहे.

वाघेश्वरनगर इथं दगडखाण कामगारांची वस्ती असलेल्या ठिकाणी २०१५ सालापासून कचरा टाकला जात होता. त्यामुळे परिसरात सुमारे दोन ते तीन एकर जागेवर कचऱ्याचे मोठे ढीग लागून प्रचंड दुर्गंधी पसरली होती. याशिवाय डास, किटकांचा प्रादुर्भाव वाढून डेंग्यूसारखे आजार पसरल्यामुळे काहींचा मृत्युही ओढवला होता. २०१६ मध्ये दगडखाण कामगार परिषदेच्यावतीनं संतुलन संस्थेनं प्रदूषण नियंत्रण महामंडळ तसंच वाघोली ग्रामपंचायतीला नोटिसाही दिल्या. परंतु, या समस्येची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे संतुलन संस्थेने २०२० मध्ये राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडे दावा दाखल केला. त्यावर न्यायाधिकरणानं हा निकाल दिला.

**<><><><><>**

पुण्यात कल्याणीनगर इथं शनिवारी रात्री झालेल्या वाहन अपघात प्रकरणी, आरोपी अल्पवयीन असल्याने त्याला जामीन मिळाला. मात्र पोलीस विभाग याविरोधात सत्र न्यायालयात याचिका दाखल करणार आहे, असं पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्ट केलं. ते आज पत्रकारांशी बोलत होते. पुण्यातील एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाच्या मुलाने मद्यधुंद अवस्थेत भरधाव गाडी चालवत दोघांना धडक दिली. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. मुलाचे वडील आणि मुलाला मद्य देणाऱ्या पब मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं आयुक्तांनी सांगितलं. या

प्रकरणी कोणालाही वाचवण्यात येणार नाही. विना नंबरप्लेट गाडी देणाऱ्या वाहन वितरकावर देखील कारवाई केली जाईल, असं आयुक्तांनी सांगितलं.

**<><><><><>**

गोंदिया शहरातल्या बाजारपेठेत लवकरच अडीच लाख रुपये किलो किंमतीचा मियाझाकी आंबा विक्रीसाठी येणार आहे. जपानच्या मियाझाकी शहरात उत्पादित होणारा हा आंबा आता गोंदियातही पिकतो आहे. प्रगतशील शेतकरी भालचंद्र ठाकूर यांनी तीन वर्षांपूर्वी या आंब्याची लागवड केली होती. या वर्षी पहिल्यांदाच त्याचं फळ हातात आलं आहे.

**<><><><><>**

अहमदनगर जिल्ह्यातल्या कौठवाडी इथं काल कठ्याची यात्रा साजरी झाली. कठ्यात म्हणजेच मडक्यात अग्नी पेटवून तो डोक्यावर मिरवण्याची प्रथा या यात्रेत पाळली जाते. यंदा असे ७४ कठे पेटवले होते. पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, धुळे, कल्याण आणि विदर्भातून असंख्य लोक या यात्रेसाठी आले होते.

**<><><><><>**

थायलंडमध्ये बँकॉक इथं सुरू असलेल्या आशियाई ॲथलटिक रिले चॅम्पियनशीपमध्ये भारतीय मिश्र संघाने सुवर्ण पदकावर आपलं नाव कोरलं आहे. मोहम्मद अजमल, ज्योतिका श्री, अमोज जेकब आणि शुभा वेंकटेशन यांच्या संघाने ४ बाय चारशे मीटरच्या शर्यतीत विजय मिळवला. दरम्यान, श्रीलंकेच्या संघाने रौप्य तर व्हिएतनामच्या संघाने कांस्य पदक पटकावलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल गुवाहाटीत होणारा राजस्थान रॉयल्स आणि कोलकता नाईट रायडर्स यांच्यातला सामना पावसामुळे रद्द झाला. त्यामुळे दोन्ही संघांना एक एक गुण मिळाला आहे. प्लेऑफसाठी उद्या कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायजर्स हैद्राबाद यांच्यात सामना होईल.

**<><><><><>**

वाशिम जिल्ह्यात आज वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे मंगरूळपीर शेलुबाजार इथल्या कृषी उत्पन्न बाजार समितीत हजारो क्विंटल शेतमालाचं नुकसान झालं आहे. तर सांगली जिल्ह्यातल्या वाळवा आणि आटपाडी तालुक्यातही आज जोरदार पाऊस झाला. यामुळे काही घरांवरली पत्रं उडाली तर काही ठिकाणी झाडं उन्मळून पडल्याचा प्रकार घडला आहे. तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या गंगापूर तालुक्यातही वादळी वाऱ्यामुळे झाडं उन्मळून पडली आहेत.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात आज राज्यात अनेक मान्यवरांनी मतदानाचा अधिकार बजावला आहे.

**राज्यपाल** रमेश बैस आणि त्यांच्या पत्नी यांनी मलबार हिल इथल्या राजभवन क्लब मतदान केंद्रावर मतदानाचं कर्तव्य बजावलं.

**तसंच मुख्यमंत्री** एकनाथ शिंदे यांनी ठाण्यात सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला. त्यांच्यासोबत कल्याण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांनीही मतदान केलं. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही कुटुंबियांसह

मतदानाचा हक्क बजावला. **हिंदी आणि मराठी** चित्रपटसृष्टीतल्या अनेक कलाकारांनीही आज मतदानाचा अधिकार बजावला. अभिनेत्री आणि भाजपा नेत्या हेमा मालिनी, ज्येष्ठ गीतकार गुलजार, गायिका आशा भोसले, अभिनेता नाना पाटेकर, आमिर खान, अक्षय कुमार, सुनील शेट्टी, राजकुमार राव, रणदीप हुड्डा, रणवीर शौरी, प्रशांत दामले, गीतकार जावेद अख्तर आणि शबाना आझमी यांनी आज मतदान केलं. तसंच फरहान अख्तर, जोया अख्तर, जान्हवी कपूर, सान्या मल्होत्रा, शाहीद कपूर, अर्शद वारसी, अनिता राज आणि ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे यांनी मतदानाचा अधिकार बजावला.

**राज्याचे** मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज मतदानाचं कर्तव्य बजावलं. तसंच पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, पोलिस आयुक्त विवेक फणसळकर यांनीही मतदान केलं.

**<><><><><>**

राज्यात येत्या दोन दिवसांत तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातल्या काही जिल्ह्यांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडणार आहे. तर कोकणात उद्या उष्ण आणि दमट हवामान राहणार असल्याचं हवामान विभागाने सांगितलं आहे. कोकणात बऱ्याच ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत वाढ झाली आहे. तर विदर्भ आणि मराठवाड्यात कमाल तापमानात घट झाल्याचं हवामान विभागाने म्हटलं आहे.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० मे २०२४ - सोमवार

**//<><><><><><>//**